
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | मंगळवार, 19 मे 2026 | अंक क्र. 356 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रासाठी ३०१ कोटींचा सुधारीत आराखडा मंजूर!

## वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता नियोजन विभाग राबवणार; शिखर समितीच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय



**मुंबई (प्रतिनिधी)**

पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान याच वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिर आणि परिसराच्या विकासासाठी महायुती सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईत पार पडलेल्या शिखर समितीच्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांच्यासह अनेक वरिष्ठ मंत्री उपस्थित होते.

विशेष म्हणजे, दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार हयात असताना धनंजय मुंडे यांनी हा विकास आराखडा नियोजन विभागामार्फत राबवण्याची मागणी केली होती. प्रशासकीय दिरंगाई टाळण्यासाठी घेतलेला हा निर्णय अखेर सरकारने मान्य केला असून, आता या कामाला कमालीची गती मिळणार आहे. धनंजय मुंडे यांनी या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्य सरकारचे विशेष आभार मानले आहेत.

या बैठकीत धनंजय मुंडे यांनी सध्या सुरू असलेल्या व आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या विविध कामांबाबत सविस्तर चर्चा करत आगामी सर्व कामांना एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली, त्यासही सकारात्मक प्रतिक्रिया देण्यात आली. श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा पूर्वी २८६ कोटी रुपयांचा होता, त्यास वाढीव मान्यता दिल्याने धनंजय मुंडे यांनी राज्य सरकारचे विशेष आभार मानले आहेत. या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार, मंत्री गणेश नाईक, मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे यांच्या सह वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

**पूर्वीचा 286 कोटींचा निधी आणि आत्ताचा 15.54 कोटींचा वाढीव निधी यांचा असणार नवा प्लॅन!**

**परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्राचा चेहरामोहरा बदलणार शिखर समितीत शिक्कामोर्तब!**

**धनंजय मुंडेंच्या प्रयत्नांना यश!**





**सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी आता थेट नियोजन विभाग हा आराखडा राबवणार.**

**मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मुंबईतील शिखर समितीच्या बैठकीत शिक्कामोर्तब**

## पूर्वीचा 286 कोटींचा आराखडा आता 301.54 कोटींवर!

# UDID कार्ड नसले तरी दिव्यांगांचे मानधन थांबणार नाही ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ!


## डॉ. संतोष मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश; राज्यातील दीड लाख दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा

**परळी (प्रतिनिधी) |**

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धपकाळ, विधवा आणि अपंग निवृत्ती वेतन योजना अशा विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. या योजनांतर्गत लाभ घेणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांसाठी 'दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे वैश्विक ओळखपत्र' म्हणजेच UDID कार्ड बंधनकारक करणारे परिपत्रक शासनाने काढले होते. मात्र, सद्यस्थितीत राज्यातील अनेक दिव्यांग बांधवांकडे हे कार्ड उपलब्ध नसल्यामुळे, त्यांना दरमहा मिळणारे अनुदान (मानधन) मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या होत्या.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने दिव्यांग बांधवांच्या हितासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शासनाने आता UDID कार्ड काढण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली असून, तोपर्यंत कोणत्याही दिव्यांगाचे मानधन रोखले जाणार नाही, अशी माहिती दिव्यांग कल्याण अभियान






मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी दिली. शासनाच्या या संवेदनशील निर्णयामुळे राज्यातील सुमारे दीड लाख दिव्यांग लाभार्थ्यांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील एकही दिव्यांग बांधव शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, हाच या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. ज्या दिव्यांगांकडे अजूनही हे कार्ड नाही, त्यांना नवीन UDID कार्ड मिळवून देण्यासाठी प्रशासनामार्फत सर्व आवश्यक ते सहकार्य केले जाणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल डॉ. संतोष मुंडे यांनी माजी कृषी मंत्री आ. धनंजय मुंडे, ना. पंकजाताई मुंडे आणि दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री ना. अतुल सावे यांचे विशेष आभार मानले आहेत.

> “राज्यातील एकही दिव्यांग बांधव शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, हाच आमचा संकल्प आहे. अद्याप UDID कार्ड काढले नसले, तरीही तहसील कार्यालयाकडून मिळणारे दिव्यांगांचे कोणतेही मानधन थांबविले जाणार नाही.
> **— डॉ. संतोष मुंडे**
> (उपाध्यक्ष, दिव्यांग कल्याण अभियान मंत्रालय)



# उत्साहात भूमिपूजन : आ.धनंजय मुंडे यांच्या आमदार निधीतून परळीतील पुरातन काळभैरव मंदिर येथे सभागृहाची होणार उभारणी !

**परळी वैजनाथ, प्रतिनिधी....**

वैद्यनाथ मंदिर परिसरात नेहरु चौक (तळ) भागातील पुरातन श्री काळभैरव मठ संस्थानचे मंदिर आता नवे रूप घेणार असून माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या आमदार निधीतून याठिकाणच्या सभागृहासाठी वीस लक्ष रुपयांचा स्थानिक विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून बहुउद्देशीय सभागृह उभे राहणार आहे. या सभागृहाच्या बांधकामाचे भूमिपूजन रविवारी (.दि.१७) ह.भ.प. भरत महाराज जोगी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

परळी वैजनाथ ही ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाची नगरी आहे. वैद्यनाथ मंदिर व परिसरात पुरातन अनेक मठ, मंदिरे आणि देवालये आहेत. या जुन्या वास्तूंना नव्याने रुप देवून हा पुरातन वारसा व संस्कृतीची प्रतिके जपणे अत्यंत गरजेचे ठरते. तसेच ही मंदिरे परळी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहेत. श्री काळभैरवाचे तळावरील मंदिर अतिशय जाज्वल्य असे श्रद्धास्थान असून या ठिकाणी सुसज्ज असे बहुउद्देशीय सभागृह उभे राहिले पाहिजे अशी नागरिक व श्रद्धाळू भाविकांची भावना होती. या अनुषंगाने येथे बहुउद्देशीय सभागृह उभारणीसाठी परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या स्थानिक विकास निधी मधून वीस लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय सामाजिक सभागृहाचे ह.भ.प. भरत महाराज जोगी व मान्यवरांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, श्री काळभैरव मंदिर चे विश्वस्त ह.भ.प. भरत महाराज जोगी, न.प.चे गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक जयराज देशमुख, पत्रकार संजय खाकरे, अक्षय शिंदे, इंद्रजीत विभुते,विशाल चव्हाण, अमोल वाघमारे, अमोल विभुते, व्यंकटेशराव गंगावणे, दीपक नागेश्वर आदी उपस्थित होते.

# संपादकीय


## भारतीय पर्यटनाचे स्वरूप बदलणारे 'सॅफ्रनस्टेज'

भारतीय प्रवाशांची मानसिकता गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलत आहे. केवळ पर्यटन स्थळ पाहणे इतक्यावर समाधान न मानता, आता प्रवासी त्या ठिकाणाच्या संस्कृतीत मिसळून 'स्थानिकांसारखे' जगण्याचा अनुभव शोधत आहेत. याच बदलत्या प्रकृत्तीला ओळखून एक अनोखी वाट चोखाळली ती 'सॅफ्रनस्टेज' या कंपनीने.

२०१६ साली तेजस परुळेकर यांनी स्थापन केलेली ही कंपनी आज देशभरातील नयनरम्य ठिकाणी खासगी, आलिशान बंगल्यांमधून प्रवाशांना वेगळाच अनुभव देत आहे. एका कर्मचाऱ्यापासून सुरू झालेला हा प्रवास आज ११५ कर्मचारी, ३५० केअरटेकर्स आणि तब्बल ४५ कोटी रुपयांच्या वार्षिक उलाढालीपर्यंत पोहोचला आहे. या यशामागे आहे एक साधी, पण प्रभावी कल्पना. तेजस आणि तिचे पती देवेंद्र परुळेकर यांनी आपल्या युरोप प्रवासादरम्यान अनुभवलेल्या 'बेड अँड ब्रेकफास्ट' आणि अपार्टमेंट स्टेने त्यांना विचार करायला भाग पाडले. लहान मुलांसोबत प्रवास करताना हॉटेलपेक्षा खासगी जागा, स्वयंपाकघर आणि निवांत वातावरण किती महत्त्वाचे आहे, हे त्यांना जाणवले.

स्पेन आणि फ्रान्समधील संथ, आरामदायी सुट्ट्यांचा अनुभव घेतल्यानंतर त्यांच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला. भारतामध्ये अशी सोय सहज का उपलब्ध नाही? मुंबईत वाढलेल्या तेजसला प्रवासाची आवड लहानपणापासूनच होती. तिच्या वडिलांच्या नोकरीमुळे तिच्या कुटुंबाला माथेरान, महाबळेश्वरसारख्या ठिकाणी हॉलिडे होम्समध्ये राहण्याचा अनुभव मिळत असे. तिचं कुटुंब एका आठवड्यासाठी पूर्ण बंगला भाड्याने घेत. स्वयंपाकीसोबत असायचा. तो संपूर्ण बंगला आपल्यासाठी आहे ही भावना काही काळापुरती का असेना पण समाधान देऊन जायची. तो अनुभव अविस्मरणीय तेजससाठी होता. आर. ए. पोदार कॉलेजमधून शिक्षण घेतल्यानंतर तेजस हिने सनदी लेखापाल अर्थात चार्टर्ड अकाऊंटंटचा अभ्यासक्रम पूर्ण केला. आयसीआयसीआय लिमिटेडमध्ये मुख्य व्यवस्थापक पदापर्यंत मजल मारली. कालांतराने तिचे लग्न देवेंद्र परुळेकर यांच्यासोबत झाले. ते अर्न्स्ट अँड यंग या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत होते. स्थिर करिअर असूनही, काहीतरी वेगळे करण्याची इच्छा तेजसला स्वस्थ बसू देत नव्हती. अनेक वर्षांच्या संशोधन आणि नियोजनानंतर २०१४ मध्ये तिने 'सॅफ्रनस्टेज'ची सुरुवात केली. सुरुवातीला ही कंपनी फक्त होमस्टे एग्रीगेटर म्हणून कार्यरत होती. मात्र, २०१५ मध्ये माथेरानमधील एका १०० वर्षे जुन्या पारशी घराच्या व्यवस्थापनाची संधी मिळाली आणि इथेच व्यवसायाला नवे वळण मिळाले. त्या क्षणापासून सॅफ्रनस्टेजने केवळ घरांची यादी न देता, स्वतः त्या मालमत्तांचे व्यवस्थापन आणि देखभाल करण्याचा निर्णय घेतला. यामुळे ग्राहकांना अधिक दर्जेदार आणि विश्वासार्ह अनुभव मिळू लागला. आज सॅफ्रनस्टेजकडे सुमारे २७० हून अधिक मालमत्ता उपलब्ध आहेत. मुंबईजवळील कर्जत, लोणावळा, पालघरपासून ते उत्तर भारतातील शिमला, मनाली, नैनिताल आणि दक्षिणेतील कुर्ग, ऊटी, वायनाडपर्यंत या सेवा विस्तारल्या आहेत. कोविड-१९ महामारीने जिथे अनेक व्यवसायांना फटका बसला, तिथे सॅफ्रनस्टेजसाठी हा टर्निंग पॉइंट ठरला. लोकांनी गर्दीच्या हॉटेल्सऐवजी खासगी व्हिलांना पसंती दिली. २०१९-२० मध्ये १५ कोटी असलेली उलाढाल त्याच्या पुढच्या वर्षी २० कोटींवर पोहोचली. लॉकडाऊननंतर तर ९०% पर्यंत बुकिंग्स व्हायचे असा तेजसचा दावा आहे. सॅफ्रनस्टेजचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्थानिक समुदायांवर दिलेले लक्ष. कंपनी स्थानिकांना केअरटेकर म्हणून नोकऱ्या देते. स्थानिक अन्नसाहित्य वापरते. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते. विशेष म्हणजे, कंपनीत ३५% महिला कर्मचारी आहेत. जे लैंगिक समतेच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.

यशाच्या या प्रवासात त्यागही तितकाच महत्त्वाचा आहे. तेजस सांगते, "आम्ही आमची जीवनशैली साधी ठेवली. महागड्या गोष्टींचा मोह टाळला. उद्योजकतेसाठी हा त्याग आवश्यक असतो." सॅफ्रनस्टेजचे लक्ष्य आता आणखी मोठे आहे. वर्षाअखेरीस २०० नवीन घरे जोडण्याची योजना असून, किल्ले, राजवाडे आणि वारसा स्थळांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. याशिवाय 'सॅफ्रनस्टेज जर्नीज' या ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मद्वारे संपूर्ण प्रवास अनुभव देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. आजच्या बदलत्या पर्यटन युगात, सॅफ्रनस्टेजने एक नवा ट्रेंड निर्माण केला आहे. प्रवास म्हणजे केवळ ठिकाण पाहणे नव्हे, तर त्या ठिकाणाला अनुभवणे. भारतातील खऱ्या संस्कृतीचा अनुभव घ्यायचा असेल, तर सॅफ्रनस्टेज हे पहिले नाव असावे, हे तेजसचं स्वप्न आहे.



# गुरुवर्य प्रा. सुरेश पुरी : माणुसकीचा अथांग स्नेहसागर

**आपल्याला सभोवताली काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे अस्तित्व हे केवळ त्यांच्या कार्यापुरते मर्यादित राहत नाही; तर ते विचारांची, संस्कारांची, प्रेरणेची आणि माणुसकीची एक अखंड परंपरा बनून पुढील अनेक पिढ्यांच्या जीवनाला दिशा देत राहते. अशी व्यक्तिमत्त्वे काळाच्या ओघात केवळ व्यक्ती राहत नाहीत, तर ती एक संस्कारपीठ बनतात. पत्रकारिता, जनसंवाद, शिक्षण, सामाजिक बांधिलकी, विद्यार्थ्यांवरील निरपेक्ष प्रेम आणि माणुसकीच्या मूल्यांचा अथांग स्नेहसागर म्हणजे आदरणीय प्रा. सुरेश पुरी सर अर्थातच आपल्या सर्वांचे लाडके बाबा!**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे माजी विभागप्रमुख तसेच प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ अध्यापन करताना त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडविले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पत्रकारिता शिकवली नाही, तर जीवन समजून घेण्याची दृष्टी दिली. त्यांच्या वर्गात शिकवला जाणारा प्रत्येक विषय हा फक्त अभ्यासक्रमाचा भाग नसे; तो वास्तव जीवनाशी जोडलेला असे. त्यांच्या शिकवणीतून विद्यार्थ्यांना संवेदनशीलता, सामाजिक जाणीव, विचारांची स्पष्टता आणि माणुसकीचा अर्थ समजत गेला.

आजच्या स्पर्धात्मक, यांत्रिक आणि मूल्यसंकटाच्या काळात प्रा. सुरेश पुरी यांच्यासारख्या शिक्षकांचे कार्य अधिक महत्त्वाचे वाटते. कारण त्यांनी पत्रकारितेला कधीच केवळ करिअर म्हणून पाहिले नाही. त्यांच्या मते पत्रकारिता म्हणजे समाजाशी असलेली नैतिक बांधिलकी. पत्रकार हा फक्त बातमी देणारा नसून समाजाच्या विवेकाचा प्रहरी असतो, ही भावना त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली.ते विद्यार्थ्यांना नेहमी सांगतात .

### "पत्रकार होण्यापूर्वी चांगला माणूस बना."

या एका वाक्यात त्यांच्या संपूर्ण शिक्षणतत्त्वज्ञानाचा सार दडलेला आहे. ज्ञान, पदवी, करिअर, यश आणि प्रतिष्ठा यापेक्षा माणुसकी अधिक मोठी आहे, हा जीवनमंत्र त्यांनी आपल्या कृतीतून विद्यार्थ्यांना दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ व्यावसायिक यशासाठी तयार केले नाही, तर सामाजिक जबाबदारी स्वीकारणारे संवेदनशील नागरिक घडविले.आजही हे कार्य निरंतरपणे सुरू आहे. प्रा. सुरेश पुरी यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. ते एक उत्कृष्ट शिक्षक, अभ्यासू पत्रकारिता तज्ज्ञ, प्रभावी वक्ते, साहित्यप्रेमी, हिंदी भाषेचे जाणकार तथा परीक्षामंत्री,हिंदी प्रचार सभा, हैदराबाद , संवेदनशील विचारवंत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांवर निरपेक्ष प्रेम करणारे गुरुवर्य आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा आहे, पण तो सामान्य नाही; त्यात सात्त्विकता आहे, पण ती दिखावूपणाची नाही; त्यात माणुसकी आहे, पण ती केवळ शब्दांत नाही—ती त्यांच्या प्रत्येक कृतीत आहे.

त्यांनी आयुष्यभर ज्ञानदानाची साधना केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तर देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना योग्य दिशा दाखवणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. त्यांच्या शिकवणीत पुस्तकांचा गंध होता; पण त्याचबरोबर जीवनाच्या वास्तवाचा स्पर्शही होता. म्हणूनच त्यांच्या वर्गातून बाहेर पडलेले विद्यार्थी केवळ पत्रकार झाले नाहीत, तर विचारशील आणि सामाजिक जाणीव असलेले माणूस बनले.

विद्यार्थ्यांशी त्यांचे नाते हे केवळ शिक्षक-विद्यार्थी इतकेच मर्यादित नव्हे तर ते विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, सल्लागार, मानसिक आधार आणि अनेक वेळा पालकही बनले. अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील कठीण प्रसंगात त्यांनी खंबीरपणे साथ दिली.आजही माझ्या सारख्या कला ,साहित्य ,संस्कृतीच्या उपासकाला मायेची उब देत असतात. कोणाच्या शिक्षणाची अडचण असो,



कोणाच्या करिअरचा प्रश्न असो किंवा वैयक्तिक संकट असो—पुरी सर विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहिलेले आहेत.

अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला त्यांच्या एका शब्दाने दिशा मिळाली. त्यांच्या एका कौतुकाने आत्मविश्वास वाढला. त्यांच्या एका मार्गदर्शनाने करिअर घडले. म्हणूनच आज देश-विदेशात विविध क्षेत्रात कार्यरत असलेले अनेक विद्यार्थी अभिमानाने सांगतात.

### "आज आम्ही जे काही आहोत, ते आदरणीय पुरी सरांमुळेच."

एखाद्या शिक्षकाची खरी कमाई ही त्याने कमावलेली संपत्ती नसते; तर त्याने घडविलेली माणसे असतात. प्रा. सुरेश पुरी यांनी अशी असंख्य माणसे घडविली, जी आज पत्रकारितेसह विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत आणि समाजसेवेत योगदान देत आहेत. प्रा. सुरेश पुरी यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची निरपेक्षता. त्यांनी कधी प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही. त्यांनी पद, पैसा किंवा सन्मान यामागे धाव घेतली नाही. विद्यार्थ्यांचे यश हीच त्यांची खरी कमाई होती. ज्ञानाचा, अनुभवाचा किंवा पदाचा किंचितही अहंकार त्यांच्या वागण्यात कधी दिसला नाही. अत्यंत साधेपणाने, पारदर्शकतेने आणि सच्चेपणाने ते आयुष्य जगत आहेत. त्यांच्या सहचारिणी विजयमाला पुरी सर्वांच्या लाडक्या (काकू)यांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांवर मायेची पखरण करणाऱ्या काकूंनी अनेक विद्यार्थ्यांना आपल्या लेकरांप्रमाणे जपले. प्रा.पुरी सरांचे घर हे विद्यार्थ्यांसाठी नेहमीच प्रेम, आधार आणि आत्मीयतेचे ठिकाण राहिले. विद्यार्थ्यांना घरच्यासारखी ऊब देणारे हे दांपत्य अनेकांसाठी प्रेरणेचे केंद्र आहे.

पत्रकारिता आणि जनसंवाद क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी पत्रकारितेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. सत्य, नैतिकता, सामाजिक जाणीव, संवेदनशीलता आणि भाषेची जबाबदारी या मूल्यांचे संस्कार त्यांनी विद्यार्थ्यांवर केले. "समाजाच्या वेदनांना शब्द द्या," हा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात कायमचा कोरला गेला आहे.

आज माध्यमविश्वात वेग, स्पर्धा आणि बाजारपेठेचा प्रभाव वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत मूल्यनिष्ठ पत्रकारितेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. प्रा. सुरेश पुरी यांनी विद्यार्थ्यांना शिकवलेली पत्रकारिता ही माणसाशी जोडलेली पत्रकारिता आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना बातमीमागील वास्तव समजून घेण्याची दृष्टी दिली. गरीब, वंचित, शोषित आणि दुर्लक्षित समाजघटकांच्या प्रश्नांना आवाज देण्याचे धैर्य दिले.

त्यांच्या मते पत्रकारितेचे खरे सामर्थ्य हे सत्तेला प्रश्न विचारण्यात आणि समाजाच्या दु:खाला अभिव्यक्त करण्यात आहे. पत्रकाराने निर्भय, प्रामाणिक आणि संवेदनशील असले पाहिजे, हा संदेश त्यांनी सातत्याने दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे, हे समजावून सांगितले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून "प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिप" ही योजना सुरू करण्यात आली, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया' या राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार संघटनेच्या वतीने पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. बारामती येथे आयोजित कार्यशाळेत या स्कॉलरशिपचा शुभारंभ करण्यात आला.

ही योजना केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित नाही. ती पत्रकारितेतील मूल्यसंस्कारांचा सामाजिक संकल्प आहे. आर्थिक अडचणींमुळे शिक्षण घेऊ न शकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही योजना आशेचा दीपस्तंभ ठरणार आहे. व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने तीन लाख रुपयांची ही स्कॉलरशिप उपलब्ध करून देण्यात येणार असून, निवड प्रक्रियेद्वारे पात्र विद्यार्थ्यांना मदत केली जाणार आहे. ही स्कॉलरशिप म्हणजे प्रा. सुरेश पुरी यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचे सामाजिक रूप आहे. त्यांनी आयुष्यभर विद्यार्थ्यांना उभे केले; आता त्यांच्या नावाने सुरू झालेली योजना अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणार आहे. शिक्षण आणि संस्कार यांची सांगड घालून समाजाला सक्षम पत्रकार देण्याचे हे कार्य पुढील काळात अधिक व्यापक होणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ समाजकार्य महाविद्यालयाच्या "स्मृती संगम-२०२४" अंतर्गत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. हा सन्मान म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या निष्ठावान कार्याची समाजाने घेतलेली दखल आहे. त्यांनी घडविलेले विद्यार्थी आज देशभर विविध क्षेत्रांत कार्यरत असून समाजसेवा करीत आहेत. हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. १९ मे हा त्यांचा जन्मोत्सव म्हणजे विद्यार्थ्यांसाठी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असतो. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी असलेला आदर हा शब्दांच्या पलीकडचा आहे. अनेक विद्यार्थ्यांसाठी ते केवळ शिक्षक नाहीत; ते जीवनाचे सारथी आहेत.

***"काही माणसं असतात<br>पिंपळाच्या पानासारखी,<br>कायमच हृदयाच्या<br>पुस्तकात राहण्यासारखी..."***

***या ओळी जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठीच लिहिल्या गेल्या आहेत.***

आजच्या काळात शिक्षकांची भूमिका केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरती मर्यादित होत चालली असताना, प्रा. सुरेश पुरी यांनी शिक्षणाला माणूस घडविण्याचे माध्यम बनवले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान दिले नाही, तर संस्कारांची बीजे पेरली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी जगण्याची प्रेरणा दिली.

त्यांचे कार्य एका लेखात, एका पुस्तकात किंवा एका सन्मानात मावणारे नाही. ते अनेक पिढ्यांच्या स्मरणात जिवंत राहणारे संस्कारविश्व आहे. त्यांनी घडविलेली माणसे हीच त्यांची खरी संपत्ती आहे. त्यांच्या सहवासातून हजारो विद्यार्थ्यांना जीवनाचा अर्थ समजला, संघर्ष करण्याची ताकद मिळाली आणि समाजाशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा मिळाली.

***आजही तीच ऊर्जा कायम आहे.<br>अशा या माणुसकीच्या अथांग स्नेहसागर गुरुवर्यांना स्वास्थपूर्ण, निरामय आणि आनंददायी जीवन लाभो.<br>त्यांच्या जीवनकार्याचा प्रकाश पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहो, हीच जन्मोत्सव निमित्ताने सम्यक मंगलकामना!***

**■ प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे, संवाद:9822836675**

## रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना

### समितीच्या वतीने आ. कराड यांचे आभार

**लातूर** : रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती नुकतीच गठीत करण्यात आली असून या समितीच्या नवनिर्वाचित अध्यक्ष व सदस्यांनी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून समितीच्या माध्यमातून काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती गठीत केली आहे.

रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीवर नियुक्ती करून गोरगरीब निराधार व्यक्तींना आधार देण्याचे काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून समिती अध्यक्ष सतीश रावसाहेब आंबेकर आणि सर्व सदस्यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्यासह रेणापूर पंचायत समितीचे उपसभापती शरद दरेकर, मुख्यमंत्री पाणंद शेत रस्ता समिती सदस्य अनिल भिसे, भाजपाचे अॅड. दशरथ सरवदे, अॅड. मनोज कराड, संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य ललिता कांबळे, विठ्ठल कस्पटे, गोविंद देशमुख, सुरेश बुड्डे, कस्तुरबाबाई माने, संजय चव्हाण, सदानंद पिंपळे, वीरेंद्र चव्हाण, सतीश जाधव त्याचबरोबर राजेश काळे, मुकुंद मेटे, वाजिद पटेल, संदिपान मेकले, बालाजी फड यांच्यासह अनेक जण होते.

## नवी मुंबई रेल्वे स्थानकांचे होणार कायापालट खासदार नरेश म्हस्के यांच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई** : नवी मुंबईतील सिडकोच्या अखत्यारीतील रेल्वे स्थानके येत्या ६ महिन्यांत मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. खासदार नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने मध्य रेल्वे आणि सिडको प्रशासनाची संयुक्त बैठक छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पार पडली. गेल्या अनेक वर्षांपासून नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांमध्ये दुरवस्था, देखभालीचा अभाव आणि अपुऱ्या प्रवासी सुविधांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. दोन्ही प्राधिकरणांतील समन्वयाअभावी समस्या वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. या बैठकीत सिडकोच्या अखत्यारीतील वाशी, बेलापूर, खारघर, ऐरोली, रबाळे, कोपरखैरणे, घणसोली, तुर्भे, खारकोपर आणि इतर स्थानकांचे व्यवस्थापन मध्य रेल्वेकडे देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच पावसाळापूर्व देखभाल, दुरुस्ती आणि दैनंदिन व्यवस्थापन तातडीने करण्याचे आश्वासन रेल्वे प्रशासनाने दिले.

'अमृत भारत' योजनेअंतर्गत नवी मुंबईतील स्थानकांचे आधुनिकीकरण, बंद तिकीट खिडक्या सुरू करणे, तसेच फूट ओव्हर ब्रिज आणि भुयारी मार्गांची कामे गतीने पूर्ण करण्यावरही भर देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नवी मुंबईतील प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि सुखकर होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# NEET पेपरफुटीचा लातूर पॅटर्न? मुलाला डॉक्टर बनवण्यासाठी आणि क्लासची पत वाढवण्यासाठी मोटेगावकरांनी फोडला पेपर!

**मुंबई | वृत्तसंस्था**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट' (NEET) परीक्षा पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि धक्कादायक खुलासा झाला आहे. लातूर येथील प्रसिद्ध 'रेणुकाई करिअर सेंटर' (RCC) चे संचालक शिवराज मोटेगावकर यांनी स्वतःच्या मुलाला वैद्यकीय प्रवेशासाठी जास्त गुण मिळावेत आणि आपल्या कोचिंग क्लासची बाजारातील पत वाढावी, यासाठीच हा संपूर्ण कट रचल्याचा संशय केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) व्यक्त केला आहे. सीबीआयच्या तपासातून या सुनियोजित रॅकेटचा संपूर्ण उलगडा झाला आहे.

### NTA च्या पॅनलवरच बसवले आपले 'मोहरे'

सीबीआयच्या प्राथमिक तपासानुसार, मोटेगावकर यांनी अत्यंत चालाखीने नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (NTA) प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर आपल्याच क्लासमधील दोन विश्वासू प्राध्यापकांची नियुक्ती करून घेतली होती. यामध्ये पी. व्ही. कुलकर्णी (केमिस्ट्री) आणि मनीषा मांढरे (बायॉलॉजी) यांचा समावेश होता. या दोघांच्याच माध्यमातून परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका मिळवून त्या मोटेगावकरांपर्यंत पोहोचवल्या जात असल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे.



### स्वतःच्या मुलासाठी आणि 'आरसीसी'च्या प्रतिष्ठेसाठी कट?

मोटेगावकर यांचा मुलगा यंदा बारावीत असून त्यानेही नीटची परीक्षा दिली होती. त्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळावा, हा या पेपरफुटीमागील एक मुख्य हेतू असण्याची शक्यता आहे. याशिवाय, लीक झालेल्या प्रश्नपत्रिकेच्या आधारे आपल्या क्लासच्या विद्यार्थ्यांचे गुण वाढवून, 'आरसीसी'चा रिझल्ट मोठा दाखवणे आणि त्याद्वारे कोट्यवधी रुपयांची नवी कॉर्पोरेट फी लाटणे, हा यामागील दुसरा मोठा व्यावसायिक हेतू होता. मोबाईलमध्ये सापडली प्रश्नपत्रिका; टेलिग्रामचा वापर सीबीआयने न्यायालयात दावा केला आहे की, मोटेगावकर यांच्या मोबाईलमध्ये ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेची कथित लीक झालेली प्रश्नपत्रिका आढळून आली आहे. हे प्रश्न आणि उत्तरे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'टेलिग्राम' या सोशल मीडिया ॲपचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.

### मोटेगावकर ९ दिवसांची सीबीआय कोठडीत

या संघटित गुन्हेगारी टोळीचा सक्रिय सदस्य असलेल्या शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने रविवारी लातूरमधून अटक केली होती. त्यानंतर दिल्लीतील विशेष सीबीआय न्यायालयाने सोमवारी मोटेगावकर यांना नऊ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. आता सीबीआयच्या रडारवर 'एनटीए'मधील (NTA) वरिष्ठ अधिकारी आहेत. मोटेगावकर यांनी कुलकर्णी आणि मांढरे या दोघांची एनटीएच्या गोपनीय पॅनलवर नियुक्ती नेमकी कशी करून घेतली? दिल्लीतील कोणत्या बड्या अधिकाऱ्यांनी त्यांना मदत केली? आणि या बदल्यात किती कोटींची उलाढाल झाली? याचा शोध आता सीबीआय घेत आहे. या प्रकरणात लवकरच आणखी काही मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




# गंगाखेडकरांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार : आ डॉ राहुल पाटील

## जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा भव्य नागरी सत्कार संपन्न

**गंगाखेड (प्रतिनिधी)**

गंगाखेड तालुका व मतदार संघ निश्चित बाळासाहेब, उद्धव ठाकरे साहेबांच्या विचारावर प्रेम करणारा आहे त्यात काही शंका नाही. आज पर्यंत मी केवळ परभणी विधानसभा पुरता कार्यक्षेत्र असल्याने मर्यादा येत होत्या परंतु आता पक्षाने संपूर्ण परभणी जिल्ह्याची संघटनात्मक जबाबदारी सोपवली आहे म्हणून यापुढे मी गंगाखेडकरांचा सुख दुःख विकासात्मक कार्यासाठी आणि पक्षाच्या जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे राहणार असे प्रतिपादन परभणी आमदार डॉक्टर राहुल पाटील यांनी नागरी सत्कार समारंभात अध्यक्ष स्थानावरून व्यक्त केले.

दिनांक 18 मे रोजी शिवसेना नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा व्यापारी संघ व विविध सामाजिक संघटना आणि शिवसेना यांच्या वतीने मोरया फंक्शन हॉल येथे भव्य नागरी सत्कार करण्यात आला . यावेळी व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख रवी धर्मे परभणी महानगरप्रमुख डॉक्टर विवेक नावंदर रिपब्लिकन पक्षाचे राज्य उपाध्यक्ष चेअरमन डॉक्टर सिद्धार्थ भालेराव विठ्ठलराव रबडे मामा डॉक्टर सुभाष कदम माझी जि प सभापती श्रीनिवास मुंडे नगरसेवक धम्मानंद घोबाळे ज्येष्ठ तथा माझी उपसभापती पंडितराव मुंडे गुरुजी मनोर महाराज केंद्रे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमानी सुभाष दादा नळदकर उपजिल्हाप्रमुख महादेव शेंडगे बालाजी लोखंडे साहेबराव कल्याणकर तालुकाप्रमुख जानकीराम पवार बापूराव पोळ छगनराव मोरे तालुका संघटक धोंडीराम जाधव शिक्षक सेनेचे बाळासाहेब राखे,सायस चिलगर शिवसेनेचे तालुका अधिकारी भागवत शिंदे शहर संघटक अमोल खतिंग प्राध्यापक मुंजाजी चोरघडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी सत्कारमूर्ती विष्णू मुरकुटे बोलताना म्हणाले की मला शिवसेनेच्या सर्वोच्च जिल्हाप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली याचे कारण मी केलेले सामाजिक कार्य कधीही भक्षभेद न करता प्रत्येकाच्या सुखदुःखात आणि कामात उभा गरजूंना मदत या सर्व बाबींचा विचार करून पक्षाने माझ्यावर जबाबदारी दिली आहे ती चोखपणे पार पडणार असे वचन मी उद्धव साहेब ठाकरे आणि आमदार डॉक्टर राहुल पाटील यांना याप्रसंगी देत आहे. यावेळी डॉक्टर सिद्धार्थ भालेराव जिल्हा रवी धर्मे डॉक्टर विवेक नावंद विठ्ठलराव डॉक्टर सुभाष कदम मनोहर महाराज केंद्रे गोविंद यादव आदीने मनोगत केले.आणि विष्णू मुरकुटे यांच्या कार्याचा बद्दल गौरव उदगार काढले. यावेळी पुढे बोलताना डॉक्टर पाटील म्हणाले की परभणी जिल्हा हा कायम शिवसेनेचा बालेकिल्ला असेल यात शंका नाही भविष्यात दोन्ही जिल्हाप्रमुखाच्या शिवसैनिकाच्या मदतीने चार विधानसभेवर भगवा फडकविणार आहे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा मुंजाजी चोरघडे, सूत्रसंचालन बाळासाहेब राखे नागेश बोरीकर यांनी केले शेवटी आभार प्रदर्शन आयोजन समितीच्या वतीने डॉ मनोहर ब्याळे यांनी केले

# मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचा निर्णय न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करतो: मौलाना इलियास खान फलाही

**परळी प्रतिनिधी**

जमाअत-ए-इस्लामी हिंद (JIH) महाराष्ट्राचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने कमाल मौला मशीद मंदिर घोषित केल्याच्या निर्णयाबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की या निर्णयामुळे न्यायपालिकेवरील जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. मौलाना फलाही यांनी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाच्या या निर्णयाला अन्यायकारक, ऐतिहासिक पुराव्यांच्या, सरकारी नोंदींच्या तसेच पुरातत्व विभागाच्या पूर्वीच्या भूमिकेच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे.

मौलाना यांनी सांगितले की जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र, कमाल मौला मशीद समिती आणि ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (AIMPLB) यांनी हा निर्णय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याच्या निर्णयाला पाठिंबा देते. त्यांनी पुढे सांगितले की हा निर्णय केवळ ऐतिहासिक पुराव्यांच्या विरोधात नाही, तर ऐतिहासिक महसूल नोंदी, ब्रिटिशकालीन कागदपत्रे आणि शतकानुशतके मुस्लीम समाजाचा या मशिदीशी असलेला धार्मिक संबंध यांच्याही विरोधात आहे. त्यांनी हेही निदर्शनास आणून दिले की 1991 चा 'प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट'नुसार 1947 मध्ये ज्या स्थितीत उपासनेची स्थळे होती, तीच स्थिती कायम ठेवणे आवश्यक आहे. पुरातत्व विभागाने या स्थळाला संयुक्त धार्मिक स्वरूप असल्याचे मान्य केले होते आणि अनेक दशकांपासून अधिकृत फलकांवर या स्थळाला "भोजशाळा/कमाल मौला मशीद" असे संबोधले जात होते, जे त्याच्या संयुक्त धार्मिक स्वरूपाचे प्रतीक आहे. 2003 पासून हिंदूंना मंगळवारी पूजा करण्याची आणि मुस्लीमांना शुक्रवारी नमाज अदा करण्याची परवानगी होती, जे एक प्रशासकीय व्यवस्था दर्शवते. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाचा हा निर्णय स्थापित प्रशासकीय भूमिकेच्या विरोधात आहे.

न्यायालयात मुस्लिम पक्षाने असा युक्तिवाद केला की ऐतिहासिक महसूल नोंदींमध्ये या इमारतीची सातत्याने मशीद म्हणून नोंद करण्यात आली आहे आणि याच ठिकाणी राजा भोज यांच्या काळातील सरस्वती मंदिर अस्तित्वात होते, असे सिद्ध करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तरीही मशिदीला मंदिर घोषित करणे हा अत्यंत दुर्दैवी निर्णय आहे. ऐतिहासिक पुरावे आणि सरकारी नोंदींवर अवलंबून राहण्याऐवजी उच्च न्यायालयाने संस्कृत परंपरा, सभ्यतागत दावे आणि साहित्यिक व्याख्यांवर आधारित निर्णय दिला, ही अत्यंत खेदजनक बाब आहे.



# सौ. कविता आंधळे यांना "अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती पुरस्कार" जाहीर

**आष्टी प्रतिनिधी**

समाजहिताची जाणीव, शिक्षण क्षेत्रातील निस्वार्थ कार्य आणि सामाजिक बांधिलकी जपत अनेक वर्षे कार्यरत असलेल्या संजीवनी मेडिकल ट्रेनिंग सेंटर संचलित श्री वीरभद्र प्राथमिक आश्रम शाळेच्या उपाध्यक्षा सौ. कविता ईश्वर आंधळे यांना प्रतिष्ठेचा "अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती पुरस्कार" जाहीर झाला आहे. त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक, शैक्षणिक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात येत आहे.

महाराष्ट्र श्रम कामगार संघटना (रजि.) पुणे यांच्या वतीने आयोजित "भारत श्री कार्य गौरव सोहळा – पुणे २०२६" या भव्य पुरस्कार सोहळ्यात सौ. आंधळे यांचा गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येत आहे.

सौ. कविता आंधळे यांनी शिक्षण, सामाजिक प्रबोधन आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी सातत्याने कार्य करत समाजात एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची धडपड, महिलांमध्ये आत्मविश्वास जागविण्याचे कार्य आणि सामाजिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग यामुळे त्या समाजात विशेष ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. या पुरस्कारामुळे श्री वीरभद्र प्राथमिक आश्रमशाळा तसेच संजीवनी मेडिकल ट्रेनिंग सेंटरच्या कार्याला नवे बळ मिळाले असून परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांसाठी हा सन्मान प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना व्यक्त केली.

हा गौरव सोहळा रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, पुणे येथे संपन्न झाला. या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते मानचिन्ह, सन्मानपत्र व गौरवचिन्ह देऊन सौ. कविता आंधळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ईश्वर आंधळे, रोहिणी पवार आदी मान्यवर उपस्थित होते. "कार्य सन्मान... राष्ट्राचा अभिमान!" या घोषवाक्याला साजेसा हा पुरस्कार समाजकार्यात निस्वार्थपणे झटणाऱ्या व्यक्तींना नवी ऊर्जा देणारा ठरत आहे.

# मराठा भवनाच्या जागेवरून नवा वाद

**"मराठा भवन समाजाच्या नावाखाली भूमाफियांचा डाव?" नागरिकांमध्ये संताप**

**परळीतील मराठा समाजाला किसने कौसा फसाया : दिपक देशमुख**

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

मराठा समाजासाठी मराठा भवन उभारण्याच्या मागणीसाठी गेल्या आठ-दहा वर्षांपासून नगरपरिषदेसमोर सातत्याने आंदोलने करण्यात आली. या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व मराठा बांधवांचे प्रथम आभार मानले जात असतानाच, आता मराठा भवनासाठी देण्यात येणाऱ्या जागेवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. काही सामाजिक कार्यकर्ते व मराठा बांधवांनी या संपूर्ण प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, "मराठा समाजाच्या भावनांचा वापर करून काही भूमाफिया व राजकीय मंडळी स्वतःचे हित साधत आहेत," असा आरोप माजी नगराध्यक्षा दिपक देशमुख यानी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वी नगरपरिषदेकडून मराठा भवनासाठी इंडस्ट्रीज एरियामधील ओपन स्पेस, काळे हॉस्पिटल शेजारील जागा तसेच ब्रह्मवाडी शिवारातील सुमारे चार एकर जागा ठरावासह देण्यात आली होती. मात्र त्या जागांचा स्वीकार का करण्यात आला नाही? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

दरम्यान, आता वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागे, स्मशानभूमी लगत असलेल्या दत्त मंदिर देवस्थानच्या जमिनीबाबत कोणताही अधिकृत नगरपरिषद ठराव नसताना फक्त पत्र देऊन चतुःसीमा निश्चित करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. या जागेचा सर्वे नंबर काय? तो जाहीर करावा तसेच, स्थानिक आमदारांनी घेतलेल्या बैठकीत "नाथ प्रतिष्ठानने ही जागा दिली" असे सांगण्यात आल्याने नवीन चर्चांना उधाण आले आहे.



काही मराठा बांधवांनी सवाल उपस्थित केला आहे की, देवस्थानची जमीन शासनाची परवानगी घेतल्याशिवाय कायदेशीररित्या हस्तांतरित किंवा विक्री करता येते का? तसेच संबंधित जागा एका नगरसेवक व भूमाफियाशी संबंधित असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हायवेच्या मध्यबिंदूपासून दोन्ही बाजूंना ७५ मीटरपर्यंत कोणतेही बांधकाम करता येत नाही. त्यामुळे संबंधित जागेवर भविष्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. "ही अडचणीची जागा नाथ प्रतिष्ठानमार्फत मराठा समाजाच्या गळ्यात मारण्याचा प्रयत्न सुरू असून, त्यामागे राजकीय वर्चस्व वाढवण्याचा हेतू आहे," असा आरोप माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख याच्याकडून करण्यात आला.

"आंदोलन नगरपरिषदेकडे जागा मागण्यासाठी झाले होते, मग ओपन स्पेस न देता नाथ प्रतिष्ठानची जागा पुढे का आणली जात आहे?" असा सवाल उपस्थित करत काही मराठा बांधवांनी समाजाने जागृत भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे परळीतील राजकीय व सामाजिक वातावरण तापले असून, आगामी काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, मंगळवार 19 मे 2026
Last page

# नगरपरिषदेच्या कारभाराविरोधात घुमला "ढोल बजाव" आंदोलनाचा आवाज!

## “विकासकामांची चौकशी करा”, “घरकुल लाभार्थी यादी जाहीर करा” अशा जोरदार घोषणांनी परिसर दुमदुमून गेला






परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी नगरपरिषदेच्या कारभारावर विरोधकांनी थेट हल्लाबोल सुरू केला आहे. प्रभाग क्रमांक १५ आणि नवीन १६ नांदुरवेस परिसरातील गेल्या काही वर्षांतील विकासकामांमध्ये मोठा घोळ असल्याचा आरोप करत आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने हे आक्रमक आंदोलन छेडण्यात आले.

सन २०१६ ते २०२५ दरम्यान झालेल्या विकासकामांची सविस्तर माहिती सार्वजनिक करावी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर कामांची चौकशी करावी, प्रधानमंत्री आवास योजना व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची यादी जाहीर करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

आंदोलकांनी नगरपरिषद प्रशासनातील घोटाळ्यावर टीका करत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर कामांची तात्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे. या आंदोलनामुळे नगरपरिषद परिसरात केवळ दिवसभर ढोलचाच आवाज घेऊत होता.

- **फर्निचर खरेदी आणि पुलाच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह!**

आंदोलनकर्त्यांनी नगरपरिषद कार्यालयातील फर्निचर खरेदीच्या खर्चावर संशय व्यक्त केला असून, हा खर्च तात्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच पालखी मार्गावरील अंबेवेस येथे सुरू असलेल्या पुलाच्या कामाचीही उच्चस्तरीय चौकशी व्हावी आणि शहरात 'नमो उद्यान' उभारण्यात यावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले.

या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील, माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख, ज्येष्ठ नेते उत्तमदादा माने, गटनेते नितीन बागवाले, नगरसेवक कादर पाशा कुरेशी, यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते.

# 'एमआयटी फार्मसी' ची कु. प्रणिता झिरमाळे विद्यापीठात सर्वप्रथम

## आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन



लातूर | प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठद्वारे घेण्यात आलेल्या औषध निर्माणशास्त्र (बी फार्मसी) प्रथम वर्ष परीक्षेत लातूर येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. प्रणिता झिरमाळे हिने ९.२६ एसजीपीए (SGPA) गुण घेऊन संपूर्ण विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

लातूर एमआयटीचे महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस हे औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय दोन वर्षांपूर्वी सुरू झाले असून या महाविद्यालयात अद्यावत प्रयोगशाळा, स्मार्ट क्लास रूम, डिजिटल ग्रंथालय आणि सुसज्ज इमारत असून तज्ञ प्राध्यापकाच्या मेहनतीने प्रारंभापासूनच गुणवत्तेकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल सायन्सेस महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. प्रणिता झिरमाळे हिने ९.२६ एसजीपीए (SGPA) गुण घेऊन संपूर्ण विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच महाविद्यालयातील कु. संजीवनी कांबळे ८.७२ एसजीपीए (SGPA) कु. दुर्गा किर्दंत व ओमकार सुरोशे ८.६३ एसजीपीए (SGPA) गुण घेऊन महाविद्यालयात अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून कौतुक केले व भविष्यातही अ शाच उल्लेखनीय यशाची कामगिरी करतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

लातूर एमआयटी संकुल समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड यांनी या यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून महाविद्यालयाच्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालचे प्राचार्य डॉ. वैजिनाथ डिग्गे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. मधुकर गुट्टे, महाविद्यालयाचे प्रा. आदित्य देशमुख, प्रा. चैतन्य सिरसाट, प्रा. प्रतीक ढाकणे, प्रा. अस्लम सय्यद, प्रा. सरोजा काळजाते, प्रा. सुचिता खंदाडे, प्रा. सोनल साळुंके, प्रा. नेहा पाटील, तसेच महाविद्यालयातील कर्मचारी सर्व श्री. विठ्ठल फड, ओंकार भिसे, विशाल हल्लाळे, ज्योती केंद्रे, सैफ नाईकवाडे, बाळू हलकंचे, शुभम साखरे, वैजनाथ कातकडे, रवि राठोड इत्यादी उपस्थित होते.

# आष्टी हद्दीत शॉर्ट सर्किटमुळे दिड एकर ऊस जळाला: वाऱ्यामुळे दुर्घटना; दोन लाखांचे नुकसान

आष्टी। प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील शेतकरी अनिता बाबासाहेब सानप यांच्या दिड एकर उभ्या ऊस पिकाची शॉर्ट सर्किटमुळे झालेल्या भीषण आगीत राख झाली. हा प्रकार सोमवारी सकाळी दहा वाजताच्या सुमारास आष्टी हद्दीतील सर्वे क्रमांक २७७ मध्ये घडला. या दुर्दैवी घटनेत शेतकऱ्याचे सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

सध्या परिसरात जोराची वादळी वारे सुटली आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी विद्युत वाहक तारांचे घर्षण होत आहे. आष्टी हद्दीतील ब्रह्मगाव शेतशिवारात



अनिता सानप यांच्या शेतालगतच्या बांधावरून गेलेल्या वीज तारा वाऱ्यामुळे आपसात घर्षणाला लागल्या. त्यातून ठिणग्या खाली पडून बांधावरील सुक्या कचऱ्याला आग लागली. त्या वेळी घटनास्थळी कोणीही नसल्याने आगीने भीषण रूप धारण केले. ही आग क्षणात अनिता सानप यांच्या उसाच्या बांधात शिरली व अवघ्या काही वेळात संपूर्ण एक एकर ऊस जळून खाक झाला.

घटनेची माहिती मिळताच तलाठी ज्ञानदेव अनारसे यांनी दुपारी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. शेतकरी अनिता सानप यांनी महावितरण कंपनीकडे तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, सुरक्षित विद्युत पुरवठ्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

# आ.धनंजय मुंडे यांच्या आमदार निधीतून परळीतील संत नामदेव महाराज मंदिर येथे सभागृह बांधकामाचा शुभारंभ

## शहरातील विविध सभागृहे ही समाजोपयोगी वास्तू ठरतील – नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी



परळी वैजनाथ | प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या आमदार निधीतून संत नामदेव महाराज मंदिर याठिकाणच्या सभागृहासाठी पंधरा लक्ष रुपयांचा स्थानिक विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून बहुउद्देशीय सभागृह उभे राहणार आहे. या सभागृहाच्या बांधकामाचा शुभारंभ आज नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

संत नामदेव महाराज मंदिर येथे बहुउद्देशीय सभागृह उभारणीसाठी परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या स्थानिक विकास निधी मधून पंधरा लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय सामाजिक सभागृह बांधकामाचा नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी , महिला व बालकल्याण सभापती अंजलीताई माळी, संत नामदेव महाराज मंदिर विश्वस्त मंडळ,उत्तम मोरे,गिरिश भोसले आदी पदाधिकारी व नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की, आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी शहरात सातत्याने विकासकामांचा धडाका सुरू आहे. हे सभागृह भविष्यात सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक उपक्रमांचे केंद्र बनेल. नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि सुविधा लक्षात घेऊन नगर परिषदेच्या माध्यमातून विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. परळी शहरातील विविध भागात आवश्यक ती विकास कामे करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. ना.पंकजाताई मुंडे आणि आ.धनंजय मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली परळी शहरात सर्वांगीण विकासाची कामे सुरु आहेत. निरंतर ही लोकाभिमुख कामे करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. शहरातील विविध सभागृहे ही समाजोपयोगी वास्तू निश्चित ठरतील असा विश्वास माजी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी यावेळी व्यक्त केला.

# वैद्यनाथ विद्यालयाचे निवृत्त शिक्षक कै.धोंडीराजआप्पा बुरांडे यांचे निधन



परळी वैजनाथ | वैद्यनाथ विद्यालयाचे निवृत्त शिक्षक धोंडराजआप्पा गुरुसिद्ध आप्पा बुरांडे रा.आंबेजोगाई (गिरवलीकर) यांचे वयाच्या 81 व्या वर्षी वृद्धापकाळाने दि. 18.05.2026 वार सोमवार रोजी सकाळी 9.30 वाजता दुःखद निधन झाले

मृत्यू पाश्चात त्यांना दोन मुले, एक मुलगी सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे त्यांचावर सोमवार दिनांक 18 मे रोजी सायंकाळी 5.30 वाजता अंबाजोगाई येथील लिंगायत स्मशानभूमी बाराखांबी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी आंबेजोगाई येथील प्रतिष्ठित व्यापारी, डॉक्टर, वकील, शिक्षक आदी मंडळी उपस्थित होते